
# मराठी ग्रामीण साहित्य

संपादक

डॉ.पांडुरंग भोसले

डॉ. हेमलता गायकवाड



# मराठी ग्रामीण साहित्य

संपादक
डॉ. पांडुरंग भोसले
डॉ. हेमलता गायकवाड

शब्दवैभव प्रकाशन

ISBN : 978-81-934248-6-5

# मराठी ग्रामीण साहित्य
Marathi Gramin Sahitya

सर्व हक्क : संपा.: डॉ. हेमलता गायकवाड
डॉ. पांडुरंग भोसले
पत्ता : १, 'सारंग', यशवंतनगर, गेंडामाळ, शाहूपुरी, सातारा
भ्रमणध्वनी : ०२१६२/२५०४७४
९४२३२५५०३८

प्रकाशक :
ज्योत्स्ना मोरेश्वर नेरकर
शब्दवैभव प्रकाशन,
शॉप नं. २१५, महालक्ष्मी मेट्रो स्क्वेअर, जोगेश्वरी लेन ४,
बुधवार पेठ, पुणे - ४११००२
भ्रमणध्वनी : ७३५०८८४८६१/८८५५८९०३०७

अक्षरजुळणी/मुद्रक :
मोरेश्वर संतोष नेरकर
शब्दवैभव प्रकाशन, पुणे
भ्रमणध्वनी : ८८५५८९०३०६/०७

मुखपृष्ठ : तुषार निवंडीकर

प्रथमावृत्ती : ६ डिसेंबर २०१७

मूल्य : दोनशे रूपये मात्र

* सदर लेखातील मतांशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

# अणुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | ग्रामीण साहित्य : संकल्पना, स्वरुप व वाटचाल<br>-डॉ. पांडुरंग भोसले | ७ - १५ |
| २. | रानातल्या कवितांचा प्रतिध्वनी<br>-डॉ. हेमलता गायकवाड | १६-२८ |
| ३. | ग्रामीण साहित्य चळवळीची वाटचाल<br>-प्राचार्य डॉ.शोभा इंगवले | २९-४२ |
| ४. | 'काया मातीत मातीत' मधील ग्रामीण वास्तव : एक शोध<br>-डॉ. राजेंद्र खंदारे | ४३-४७ |
| ५. | ग्रामीण साहित्य चळवळ आजची स्थिती<br>- डॉ. सुहासकुमार बोबडे | ४८-५८ |
| ६. | १९७५ नंतरच्या ग्रामीण साहित्याची वाटचाल<br>- डॉ. निशा भंडारे | ५९-६२ |
| ७. | १९९० नंतरची ग्रामीण कथा : स्वरूप आणि वैशिष्ट्ये<br>- प्रा. सुनिता सूर्यवंशी | ६३-६९ |
| ८. | ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण-बारोमास<br>- प्रा. मोरेश्वर नेरकर | ७०-७३ |
| ९. | १९९० नंतरचे मुस्लीम ग्रामीण साहित्य<br>- डॉ. केतकी भोसले | ७४-७९ |
| १०. | 'काळेशार पाणी' मधील ग्रामजीवन<br>- डॉ.पौर्णिमा कोल्हे | ८०-८५ |
| ११. | मराठी ग्रामीण कविता : स्वरुप आणि मर्यादा<br>- प्रा. कैलास सलादे | ८६-९६ |

# मराठी ग्रामीण कविता : स्वरुप आणि मर्यादा

प्रा. कैलास सलादे, ओझर मिग

१९६० नंतर ग्रामीण साहित्याचा जाणवण्या इतपत ठळक साहित्यप्रवाह निर्माण झाला. ग्रामीण साहित्य चळवळीने या प्रवाहाला निकोप आणि प्रवाहित करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. या ग्रामीण साहित्य प्रवाहाचा किंवा प्रकाराचा प्रारंभ हा कवितेने झालेला आहे. मराठी ग्रामीण कविता हा ग्रामीण साहित्य प्रवाहातला सशक्त आणि भारदस्त घटक आहे. मराठी ग्रामीण कवितेचा प्रारंभबिंदू निश्चितपणे सांगता येणे जसे शक्य नाही, तसे मराठी ग्रामीण कवितेचे कुणी एक जनक असल्याचे ठामपणे सांगता येणे शक्य नाही. ''ग्रामीण कवितेची सुरवात अमक्या एका कवीपासून किंवा कवितेपासून झाली असे निश्चितपणे ठरविता येत नाही. अगदी मराठी काव्याच्या सुरवातीपासूनच ग्रामीण कवितेच्या खूणा मराठी कवितेमध्ये कमी अधिक प्रमाणात दिसून येतात. अर्थात या कवितांचे स्वरुप निखळ ग्रामीण म्हणता येत नसले तरी ग्रामीण जीवनचित्रण करण्याची प्रेरणा केशवसुतांच्या काळापासून अनेक कवींच्या मनात कमी अधिक प्रमाणात निर्माण झालेली दिसून येते.''[१] मराठी ग्रामीण कवितेच्या पूर्वखुणा संत साहित्य, पंत साहित्य व नागरी समजल्या जाणाऱ्या शाहिरी कवितेतही स्पष्ट अस्पष्ट स्वरुपात सापडतात. ग्रामीण कवितेच्या प्रारंभ शोधायचा झाला तर तो लोकवाङ्मयात त्यात लोकगीतात शोधणे महत्त्वाचे ठरले.

**जानपद कविता :**

सुगी हा जानपद गीतांचा पहिला प्रातिनिधिक काव्यसंग्रह १९३३ मध्ये ग. ल. ठोकळ यांनी संपादित करुन प्रसिद्ध केला. यात गिरीश, चंद्रशेखर, माधवानुज, म. श्री. पंडित, ग.ह. पाटील, ग.ल. ठोकळ, काव्यविहारी व गो. मायदेव या सारख्या अनेक कवींच्या कविता समाविष्ट आहे. या संग्रहापूर्वी केशवसुतांच्या एक खेडे (१८८७) पासून ग्रामीण कविता लिहिली जात होती.

चंद्रशेखरांचे 'काय हो चमत्कार' (१९११) हे खंडकाव्य ग्रामीण जानपदीय आशयविश्व मांडणारेच होते. 'सुगी' नंतर पां.श्री. गोरे, बी. रघुनाथ, ग. ह. पाटील, ग. ल. ठोकळ यासारख्या कवींचा कालखंड हा जानपदीय कवितेचा काळ म्हणून ओळखला जातो. रविकिरण मंडळातील बरेच सदस्य जानपदीय कविता लिहित असल्याने त्यात गायनशीलता व उपऱ्या प्रयोगशीलतेचे प्रयोग केले गेले. उपऱ्या संवेदनशीलतेने कल्पनारम्य, सौंदर्यवादी जाणिवेने उभे केलेले जानपदीय कवितारुपी ग्रामीण विश्व नंतर हास्यास्पद झाले आणि जानपद कवितेला ओहोटी लागली. जानपद कवितेने ग्रामीण जगण्यातील कोणत्याही विषयावर ओढून ताणून कविता लिहिण्याचा अट्टहास केला. मात्र या कवितेत प्रामाणिक अनुभूतीचा अभावच होता. वि.स.खांडेकर यांनी म्हटल्याप्रमाणे 'मोले घातले रडाया' अशा थाटाची कविता खेडवळ जीवनावर लिहिण्याचा मोह होतकरु कवींना आवरता आला नाही यात महत्त्वाचे कारण खांडेकरानींच स्पष्ट केले आहे. ते लिहितात की, ''जिवंत भावना व तिची छाया यांच्यातील अंतर न कळल्यामुळे आधुनिक मराठी काव्याचा बराचसा भाग निरास व कृत्रिम झाला आहे. त्यात खेडी न पाहता. त्यातल्या आयुष्याशी समरस न होता स्त्री दाक्षिण्याप्रमाणे दीन दाक्षिण्य दाखविण्याच्या हेतूने मराठी साहित्यात असल्या कवितांची भरच पडत गेली.''[२] जानपदीय कवितांचा सुवर्णकाळ संपल्यानंतरही जानपद स्टाईलची ग्रामीण कविता निर्माण होत राहिलीच. इतका जानपद कवितेचा प्रभाव त्या काळातील कवींवर पडलेला दिसतो. जानपद कवितेने ग्रामीण जीवन शहरी वाचकापुढे मांडले त्यामुळे शहरी वर्गाला खेडे कळाले. खेड्याकडे त्यांचे लक्ष वळले व आपल्या साहित्यात खेड्याची वर्णने हटकून घालायला प्रारंभ झाला. या कवितेने खेड्याचा प्रथमदर्शनी आनंददायी, प्रणयप्रधान, स्वप्नरंजनात्मक भागच दाखविला. मात्र खेड्यातील दुःख, वेदना, प्रश्न, काळजाचे आणि व्यवस्थेचे तडे या कवितेला मांडता आले नाही ही जानपद कवितेची मर्यादा होती.

### १९६० नंतरची मराठी ग्रामीण कविता :

१९२५ च्या दरम्यान सुरु झालेला जानपद कवितेच्या प्रवाहास १९४५ च्या दरम्यान ओहोटी लागली. १९४५ नंतर मात्र ग्रामीण कविता वेगळ्या

वाटा शोधण्याचा प्रयत्न करु लागली. १९४५ नंतर मराठी साहित्याबरोबर ग्रामीण साहित्यातही बदल होऊ लागले. वास्तवाचा वेध, मनोविश्लेषण आशयाभिव्यक्तीची एकात्मता, वाङ्मयबाह्य, प्रयोजनांपासून दूर राहणे इत्यादी अनेकविध बाबींची जाणीव मराठी ग्रामीण साहित्याला झाली आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने येथूनच ग्रामीण साहित्याला दिशा मिळाली. ''१९४५ पूर्वीचे साहित्य म्हणजे ग्रामीण परिवेशातील नागर जाणिवांचे प्रकटनच होय.''[३] १९४५ नंतर ग्रामीण साहित्य आणि कविता बदलू लागली असली तरी १९६० नंतरच ग्रामीण कवितेत जाणवण्या इतपत ठळक वेगळेपणा आला. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. शिक्षणव्यवस्थांचे जाळे ग्रामीण भागांमध्ये पसरु लागले. ग्रामीण भागात महाविद्यालये सुरु झाली. त्यामुळे लिहिणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाली. तळागाळातील शेतकरी, शेतमजूर, बारा बलुतेदार शिक्षण घेऊ लागल्याने त्यांना पूर्वसुरींच्या साहित्य जाणिवांबद्दल खटकू लागले. त्यांनी निर्माण केलेले विश्व आणि आपण जगात असलेले जग यात फार मोठे अंतर आहे याची जाणीव या नवशिक्षित वर्गाला होऊ लागली. आपले गाव, खेडे, खेड्यातील माणसे, परंपरा, मूल्ये, संस्कृती यापूर्वीच्या कवींनी किती विद्रुप पद्धतीने साहित्यात मांडली हे बघून या पिढीला खंत वाटू लागली. आपण जगले भोगले विश्व कवितेत आले पाहिजे या आत्मभानातून आनंद यादवांसारखे कवी लिहिते झाले. आनंद यादवांपूर्वी बहिणाबाई चौधरी यांची लोकसाहीत्याशी नाते सांगणारी कविता महत्वाची आहे. त्यांची कविता १९५२ ला प्रसिद्ध झाली असली तरी तिचा लेखनकाळ जानपद कवितांच्या समकालीन आहे. मात्र ती कविता उशिराने प्रसिद्ध झाल्याने मराठी ग्रामीण कवितेला जानपद कवितेशी नाते सांगावे लागले. ''बहिणाबाईची कविता ग्रामीण कवितेला समृद्ध भविष्य आहे असा आशावाद पेरणारी महत्त्वाची अक्षर कविता आहे. बहिणाबाईंची कविता म्हणजे मराठी कवितेचा परिपूर्ण असा अविष्कार आहे.''[४] मराठी ग्रामीण कवितेला अतिशय वेगळे वळण लावण्याची शक्यता बहिणाबाईंच्या कवितेने निर्माण केली.

पूर्वसुंदरीच्या कवितेविषयी त्यांच्या उपऱ्या अनुभव विश्वाविषयी व ग्रामीण संवेदनशीलतेविषयी साशंक असणाऱ्या आनंद यादवांची खास ग्रामीण

अनुभव विश्व मांडणारी अस्सल गावराण मातीचा वास असणारी कविता मळ्याची मातीच्या रुपाने प्रसिद्ध झाली व ग्रामीण कवितेने जानपद कवितेचा धरलेला पदर सोडून स्वत:ची नवी वाट सुरु केली. "मराठी ग्रामीण कवितेला नवे वळण देण्याचे कार्य करणारी आनंद यादवांची कविताही मराठी कवितेच्या प्रवाहातील एक महत्त्वाचा टप्पा मानावी लागते. या कवीने अस्सल ग्रामीण जीवनानुभव चित्रित केले. त्यांच्या अभिव्यक्तीसाठी ग्रामीण बोलीचा समर्थ वापर केला. त्यामुळे मराठी ग्रामीण कवितेचे स्वरुपच या कवितेपासून बदलताना दिसते."[५] आनंद यादवांनंतर ना.धो. महानोर यांची रान, मन आणि प्रणय टिपणारी कविता प्रसिद्ध होऊ लागली. महानोरांच्या कवितेचे मूल्यमापन करताना आनंद यादवांनी नोंदवलेले एक निरीक्षण महत्वाचे आहे. ते म्हणतात की, "ना.धों. महानोर यांची वृत्ती रोमँटिक आहे. या वृत्तीतून त्यांनी रानातल्या कविता लिहिल्या म्हणूनच या संग्रहात ग्रामीण वास्तवाचे चित्र धगधगीत स्वरूपात पडण्याऐवजी एका प्रणयोत्सुक मनाचे शरीरभोगासाठी हुळहुळणाऱ्या पौगडावस्थेतील पुरूष मनाचे प्रतिबिंब पडले. रानमळ्यातील बाभळ, बोरी, नद्या, ओढे, ज्वार, तूर, कणसे, केळी यासारख्या वरवरच्या ग्रामीण वास्तवाचा केवळ प्रतिमांसाठी वापर करून त्यांनी आपली आत्मनिष्ठ रोमँटिक वृत्तीच आपल्या कवितेतून व्यक्त केली आहे."[६]

ग्रामीण वास्तवाचे अस्सल चित्रण करणारी ग्रामीण जाणिवा टिपणारी संवेदनशीलता लोकगीताशी व लोकसंस्कृतीशी नाते सांगणारी ग्रामीण बोलीभाषेची लय सायीसारखी शब्दांना लगडून येणारी विठ्ठल वाघांची कविता महत्त्वाची आहे. महानोरांच्या प्रणय भावना जशा शहरी अनुभूतीच्या वाटतात तशा वाघांच्या कविता वाटत नाहीत या कविता अस्सल ग्रामीण प्रेमभावना टिपतात. ग्रामीण माणूस त्यांचा स्वभाव प्रवृत्ती, लोकपरंपरा-संकेत अशा अनेक अंगाने ग्रामीण कविता समृद्ध करणारे महत्त्वाचे कवी म्हणून विठ्ठल वाघांचे नाव घेता येते. "विठ्ठल वाघांची कविता म्हणजे लोकानुभवाला लोकभाषा, लोकजीवन, लोकसंस्कृती, लोकगीत यांच्या अंगाने आविष्कृत करणारी लोककविता आहे. आत्माविष्कारी कवितेचे तसेच नवकवितेचे आढळणारे विविध घटक या कवितेत नसले तरी ग्रामीण लोकजीवनाला

सर्वांगाने आविष्कृत करण्याचे सामर्थ तिच्यात आहे. या सामर्थ्यामुळेच ही कविता लोकप्रिय ठरली आहे.''[७] १९६० पासून १९९० पर्यंत अनेक कवी ग्रामीण कविता लिहित असले तरी ही संख्या निश्चित समाधानकारक नाही. यातील नाव घेण्यासारखे दोन-तीनच नावे ग्रामीण कवितेत दिसतात याविषयी नागनाथ कोत्तापल्ले यांनी खंत व्यक्त केली आहे. ''१९२५ पासून मराठीत जाणीवपूर्वक ग्रामीण साहित्य निर्माण होते आहे. प्रारंभी ग्रामीण जाणिवांची अभिव्यक्ती कवितेतून होत होती परंतु कविता हा वाङ्मय प्रकार कमी कलावंतांना जवळचा वाटलेला दिसतो. ग्रामीण जाणिवांची अभिव्यक्ती करणारी किती कविता मराठीत आहे. त्यातही खऱ्या अर्थाने वास्तवाला सामोरी जाणारी कविता किती आहे याची मोजदाद केली तर काय चित्र स्पष्ट होईल ते आपल्याला माहीतच आहे.''[८] या काळातल्या ग्रामीण कवितेत हवी तेवढी व्यापकता आणि सखोलता मिळाली नसल्याची खंत कोत्तापल्ले व्यक्त करतात.

**१९९० नंतरची मराठी ग्रामीण कविता :**

१९९० नंतर मराठी ग्रामीण कवितेच्या स्वरुपात बदल होत गेला. १९९० पूर्वीची ग्रामीण कविता संथ-संयमीत सूर पकडणारी ठरली. खेड्यातील दैन्य, खेड्यातील माणसातील प्रेम, जिव्हाळा, निसर्गविलसते, प्रणयदृश्ये वास्तवाच्या अंगाने टिपली गेली. मात्र १९९० नंतरची कविता वेगळी ठरली. कारण ग्रामीण साहित्य चळवळीच्या प्रयत्नाचा काही एक भाग म्हणून नंतरच्या पिढीला आत्मभान आले. आपण शहरी अभिरूचीचा विचार न करता लिहिले पाहीजे ही साहित्यविषयक जान आणि भान या पिढीला आलेले दिसते. १९९० नंतर खेड्याचे शेतीचे प्रश्न आणि संदर्भ बदलले. खेड्याला पारंपरिक साच्यात बांधून ठेवणारी जगापासून अलिप्त राखणारी बलुतेदारी पद्धत पूर्णतः नष्ट झाली. त्यामुळे स्वयंपूर्ण असणाऱ्या खेड्यांना शहरावर अवलंबून रहावे लागते. यंत्रयुगाच्या अतिक्रमणामुळे कृषिसंस्कृतीवर हल्ले होऊ लागले. या हल्यांमुळे ग्रामीण कवी अस्वस्थ होऊ लागला. खेड्यातील अनेक लिहिणारे नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने शहरात आले पण शहराच्या वेगाशी आणि संस्कृतीशी जमवून घेणे या पिढीला जमले नाही. त्यामुळे आपले खेडे किती सुंदर आहे हे आठवण्यात आणि शहर आणि गाव यांची तुलना करण्यात ही

कविता रमू लागली. १९९० नंतर जागतिक पार्श्वभूमीवर जागतिकीकरणाची सुरवात होऊ घातली या जागतिकीकरणाचे परिणाम लवकरच ग्रामीण भागात दिसून येऊ लागले. जागतिकीकरणाची प्रक्रिया आणि त्याचे परिणाम समजून घेण्यात ग्रामीण कवितेला दहा-बारा वर्षाचा कालावधी जावा लागला. या जागतिकीकरणाने एक गोंधळाची परिस्थिती निर्माण केली, जुने खेडे बदलू लागले. परंपरा, मूल्ये, संस्कृती बदलू लागली. शहरीकरणाच्या विकाराने खेड्यांचे संदर्भ बदलू लागले. शिक्षणव्यवस्थेने खेड्यातल्या नव्याने शिकू बघणाऱ्या पिढीचा भ्रमनिरास होऊ लागला. ग्रामीण सुशिक्षितांचे लोंढे आणि त्यांचे गुंता-गुंतीचे प्रश्न सुरु झाले. विकासाच्या गोंडस नावाखाली भकासीकरणाचे प्रयत्न सुरू झाले. प्रकल्प, धरणे, उद्योगक्षेत्रे मॉल्स निर्मितीसाठी खेडे विस्थापित होऊ लागले. ह्या विस्थापितांचे प्रश्नही लेखक - कवींना अस्वस्थ करु लागले. हरितक्रांतीमुळे विकास झाला असे ओरडणाऱ्या पुढाऱ्यांना कळालेच नाही की ही खेड्यांची प्रगती झाली की मुका मार लागावा तशी सूज आली. ही प्रगतीची सूज हळूहळू ओसरू लागली. राजकारणाच्या गलिच्छ चेहऱ्याने खेड्यांमध्ये आकार घ्यायला सुरुवात केली. ह्या राजकारणाच्या विकृतीकरणामुळे खेड्यांची एकी भंग पावली आणि खेडे गाव संघर्षाच्या पार्श्वभूमीवर खडे ठाकले. जागतिकीकरणामध्ये व्यापारी पिकांना प्राधान्य दिले गेले. वाढत्या कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे भयानक सत्र सुरू झाले. या होणाऱ्या आत्महत्यांमुळे लिहिणाऱ्या पिढीच्या मनात चीड निर्माण होऊ लागली. व्यवस्थेला प्रश्न विचारण्याचे धाडस या काळातील कवींनी आणि कवितेने केले. व्यवस्था उलथून टाकल्याशिवाय शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत ह्या जाणिवेतून दलित कवितेने विद्रोह आपसूक स्वीकारला. मात्र दलित साहित्याचा लढा हा जातिव्यवस्थेविरूद्ध होता. ग्रामीण कवितेने हा विद्रोह अर्थव्यवस्थेविरुद्ध पुकारण्याचा प्रयत्न केला.

१९९० नंतर ग्रामीण कविता लिहिणाऱ्यांची संख्या लक्षणीय वाढली ह्यांची अनेक कारणे आहेत. ग्रामीण साहित्य चळवळीने खेडेगावांमध्ये छोटी-छोटी ग्रामीण साहित्य संमेलने घेतली. शिबिरे घेतली. यातून नव्याने लिहिणाऱ्यांना दिशा मिळाली. खेड्यातील अनेक कवी लेखक शहरात स्थायिक झाल्याने

शहरवासियांचे रंजन करणारी कविता याही काळात काही लुडबुडू कवींकडून लिहिली गेली मात्र नव्या दमाने ताकदीने लिहिणारे नव्या प्रश्नांना भिडणारे अनेक कवी ह्याच काळात ग्रामीण कविता लिहू लागले. ग्रामीण कविता चिंतनशील बनली या काळात इंद्रजित भालेराव यांचा 'पीकपाणी', 'पेरा', 'आम्ही काबाडाचे धनी' यासारखे संग्रह प्रसिद्ध झाले. भालेरावांची बहिणाबाईंच्या कवितेशी नाते सांगणारी साधी सोपी कविता या काळात लिहिली जात होती. बदलते खेडे, खेड्यातील प्रश्न, शेतकऱ्यांचे दु:ख, कष्ट, पराकोटीचे दारिद्र्य, गावगाड्यांचे बदललेले स्वरुप, दलालाकडून होणारी लुटमार हे भालेराव यांच्या कवितेचे विषय झाले आहेत. शेतकऱ्यांचे दु:ख साध्या सोप्या भाषेत मांडल्याने त्यांना कारूण्याची झालर प्राप्त झाली आहे. ह्याच काळात प्रणयसृष्टीत हरवलेली ना.धों. महानोरांची कविता वास्तवाच्या किनाऱ्याला लागलेली दिसते. 'प्रार्थना', 'दयाघना', आणि 'पानझड'मध्ये महानोरांनी शेतकऱ्यांची होणारी होरपळ आणि खेड्यांचे उद्ध्वस्त स्वरुप मांडले. या काळात या कवींबरोबर आणखी काही महत्त्वाचे कवी कविता लिहित होते. त्यात नारायण सुमंत, नारायण कुलकर्णी कवठेकर, उत्तम कोळगावकर, राजन देशमुख, प्रतिमा इंगोले, श्रीकांत देशमुख, लक्ष्मण कहाडिक, तुकाराम धांडे या कवींचा उल्लेख करावा लागेल. नव्या प्रश्नांना ताकदीने मांडणारी कविता या कवींनी लिहिली. यातील काही कवींनी पूर्वसुरींचे जाणवण्या इतपत अनुकरण केल्याने त्यांच्या सर्जनशीलतेला मर्यादा पडल्या.

**ताकदीने लिहिणारी नवी पिढी**

२००० नंतर जागतिकिकरणाची प्रक्रीया आणि तिच्या तीव्र परीणामांची जाणीव ह्या काळातील कवी आणि कवितांना झालेली दिसते. शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या, बेभरवशाची शेती, वाढणारा कर्जबाजारीपणा, सहकार चळवळीचे अपयश आणि त्यात बोकाळलेला भ्रष्टाचार, शिक्षणव्यवस्थेतील अपप्रवृत्ती; राजकारणाची विकृत्ती, प्रसारमाध्यमांनी खेड्यात आणून पोहचवलेला उत्तर आधुनिकतावादी भोगवादी चेहरा, राजकारण्यांच्या मतलबी व्यवहारात वापरली गेलेली तरुण पिढी, त्या पिढीची व्यसनाधिनता, खेड्याचे वाढत जाणारे बकालीकरण, ग्रामीण मनोवृत्तीचे झालेले शहरीकरण, निराशावाद,

महागाई, बेकारी, अच्छे दिनाचे तकलादू स्वप्न बघून स्वप्नभंग झालेली, हादरलेली, गलितगात्र झालेली, शहरात समावू न शकणारी परात्म पिढी पर्यायाने बार संस्कृतीला जवळ करु लागली. या पिढीसमोर फार मोठे विचित्र पेच निर्माण झाल्याने गोंधळलेल्या अवस्थेत कवितेतून काही प्रश्न मांडू लागली. बिघडलेल्या गावगाड्यातील अनेक प्रश्न ही पिढी मांडू लागली आहे. २००० नंतर लिहिणाऱ्या कवींमध्ये नव्या प्रश्नांना ताकदीने भिडणारे अनेक आशावादी चेहरे दिसतात. श्रीकांत देशमुख, ऐश्वर्य पाटेकर, तुकाराम धांडे, पृथ्विराज तौर, केशव खटींग, पी. विठ्ठल, कल्पना दुधाळ, विष्णू थोरे, भरत दौंडकर, कैलास दौंड, मोहन कुंभार, विजयकुमार मिठे, विनायक येवले, कैलास सलादे, विनायक पवार, संतोष नारायणकर, अशोक कोळी, बालाजी मदन इंगळे, रवी कोरडे, ललित अधाने, लक्ष्मण बाराहते, ज्ञानेश उगले, गणेश मरकड, नामदेव कोळी, लता ऐवळे, किरण भावसार, सचिन गांगुर्डे, रवींद्र कांगणे, हनुमंत चांदगुडे, अमृत पेलंग, प्रभाकर शेळके रावसाहेब जाधव, राजेंद्र उगले, नीलेश शेळके, शैलेश चव्हाण, राजेंद्र दिघे, अरुण पवार, रावसाहेब कुंवर, नागेश शेलार, दत्ता सोनवणे, किरण संधान, संतोष झोम, सोमनाथ पवार, सोमनाथ फुगट, रवी देवरे, सागर जाधव, विलास माळी, दयाराम गिलाणकर, काशिनाथ वेलदोडे, शिवाजी भालेराव, रुपाली खैरनार, कोमल जगझाप ही नव्या पिढीतील कवी मंडळी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून वेगवेगळ्या जाणिवांचे आविष्कार करताना दिसतात. वर दिलेली कवींची यादी आणखी वाढू शकते. यातील काही कवींचे एक किंवा अधिक काव्यसंग्रह प्रकाशित झालेले आहेत. काही कवींचे संग्रह प्रसिद्ध झालेले नसले तरी नियतकालिकातून स्फुट कविता प्रसिद्ध झाल्या आणि होत आहेत. त्यामुळे त्यांचे मूल्यमापन करुन निष्कर्ष काढण्याची घाई आताच करणे योग्य ठरणार नाही. यातल्या बऱ्याच कवींवर पूर्वसुरींचा प्रभाव जाणवत असला तरी त्यातून त्यांना स्वतःची वाट शोधता येईल इतकी आशावादी कविता यातून निर्माण होत आहे.

**ग्रामीण कवितेच्या मर्यादा**

१९९० नंतर ग्रामीण कविता लिहिणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाली.

चांगली ग्रामीण कविता निर्माण होऊ लागली. अस्सल ग्रामीण परिवेश धारण केलेली व मातीशी प्रामाणिक असलेली कविता १९९० नंतर लिहिली गेली. या काळात मोठ्या संख्येने कविता लिहिल्या गेल्या. मात्र या कवींच्या कवितेत "ग्रामीण जीवनानुभवांचे विश्वही फार मोठे नाही, फार व्यापक नाही. ग्रामीण समाज हा कृषिकेंद्रीत असणे हे सर्वाथाने या लेखकांच्या लक्षात आलेले आहे का? चांभार कुंभारापासून कोल्हाटी कैकाड्यापर्यंत सर्वच घटक ग्रामसंस्कृतीशी, कृषिजीवनाशी बांधलेले असतात. याची जाणीव किती ग्रामीण लेखकांना आहे?"[१] हा नागनाथ कोत्तापल्ले यांचा प्रश्न ग्रामीण कवितेने विचारात घ्यायला हवा होता, मात्र तसे झालेले दिसत नाही.

ग्रामीण भागामध्ये अनेक छोटी मोठी ग्रामीण साहित्य संमेलने सुरु झाली. या संमेलनांना जोडूनच काव्यसंमेलने होऊ लागली. स्वतंत्ररित्या काव्य संमेलने काव्य मैफिली काव्यगायनाचे जाहीर कार्यक्रम यांचे पेव फुटले. ग्रामीण साहित्य संमेलनांनी नवोदितांना साहित्यिक भान आणि जाण द्यायला हवी होती मात्र तसे झाले नाही. ग्रामीण भागात काव्य संमेलनाच्या नावाखाली काव्यगायनाचे जाहीर कार्यक्रम घेतले जाऊ लागले. चांगले भरघोस मानधन घेऊन काव्यावरती मिरवणारे सुपारी संप्रदाय उदयाला आले. या संप्रदायातील कवींनी व्यासपीठावर टाळ्या मिळवणाऱ्या कवींना जन्म दिला. श्रोता व प्रेक्षकशरण कविता लिहून हीच खरी ग्रामीण कविता असा चुकीचा आदर्श त्यांनी नव्या लिहित्या हातासमोर उभा केला. त्यामुळे कविता हा चिंतनशील काव्यप्रकार आहे याचे भान नव्या पिढीला नसल्याचे जाणवते. ग्रामीण भागात जी काव्यसंमेलने होतात त्यात गंभीर स्वरुपाची ग्रामीण कविता चालत नाही. ती टाळ्या घेत नाही त्यामुळे संयोजकांकडून टाळ्या घेऊ कवितांची मागणी केली जाते. ही संमेलने वा काव्य मैफली ऐकायला येणारे श्रोतावर्ग दोन घडीची करमणूक म्हणून जर या काव्यसंमेलनाकडे बघत असेल तर ग्रामीण कविता थोड्या दिवसात हास्याचा विषय झाल्याशिवाय राहणार नाही. व्यासपीठावरुन अनेक कविता गायल्या जातात मुळात कविता गाऊ नये असे मुळीच नाही. मात्र या कवितेचे गाणे व्हायला नको. आज काव्यसंमेलनामध्ये मिळत नाही आपला आवाज कविता गायनासाठी सुमधुर नाही, यासारख्या

कारणांमुळे गंभीर प्रवृत्तीची कविता लिहिणारे नवोदित कवी कवितालेखनापासून दूर झालेले दिसतात. बऱ्याच कवींचा पहिला काव्यसंग्रह चांगला गाजला. त्यावर साहित्यवर्तुळात चांगली चर्चाही घडून आली. जाणवण्याइतपत स्पार्क त्यांच्या कवितेत असूनही नंतर काव्यागायनाकडे वळल्याने व सुपारी संप्रदायात सामील होऊन कवितेच्या बारीत मिरविण्यात हे कवी धन्यता मिळवू लागल्याने ग्रामीण कवितेचे फार मोठे नुकसान झाले. काही कवी चित्रपट गीतांकडे वळल्याने चित्रपटगीते लिहून प्रसिद्धी आणि पैसा मिळविण्याचा व्यवहारवादी दृष्टिकोन स्वीकारल्याने काव्यात्मक सृजनशीलतेला मर्यादा आल्या. चित्रपट गीते आणि कविता या दोन्हीतील आविष्कार शैलीतील भिन्नता या कवींच्या लक्षात आली नाही. त्यामुळे अशा काव्यागायनोत्सुक कवींना डॉ. पंडितराव पवार गंभीरतेने सुनावतात की, ''कवींनी काव्यगायन, काव्यवाचन यात आपला अधिक वेळ घालविला तर अजून त्यांच्या आशयाच्या सृजनशील आणि बहुआयामी कवितेला रसिक मुकतील असा धोकाही आहे म्हणून आजची वाहवा उद्याच्या अधिक विचारशील कवितेला अडथळा ठरु नये.''[१०]

जानपद कवितेपासून मराठी ग्रामीण कवितेची सुरुवात झाली असे मानले जाते. पहिल्या पिढीतील बऱ्याच कवींचे भरणपोषण ह्या जानपद कवितेवरच झाल्याने यांच्या कवितेला मर्यादा पडतात. खरे तर ग्रामीण कवितेची सुरुवात म. फुल्यांच्या कवितेपासून मानायला हवी. ग्रामीण कवितेने आपली प्रेरणा लोकसाहित्य, संत साहित्य, म.फुल्यांचे साहित्य यातून घेतली असती तर आजच्या ग्रामीण कवितेचे मूल्यमापन करताना एक गोष्ट जाणवते ती म्हणजे ग्रामीण कवींनी बदलत्या ग्रामवास्तवांना सामोरे गेले पाहिजे. बदलांना स्वीकारुन नव्या आव्हानांना पेलण्याची तयारी ठेवली पाहिजे. जगण्याशी प्रामाणिक राहून सृजनशील अभिव्यक्ती केली पाहिजे. केवळ गाव, पांढरी, विठ्ठल बाप-आई, दुष्काळ, सावकार, आत्महत्या किंवा शहरात राहून गाव किती सुंदर आहे ह्या भूपाळ्यांना टाळून नव्या जाणिवा संवेदना तीव्र स्पंदनासहीत कवितेत टिपायला हव्या. त्यासाठी ग्रामीण कवींनी अंतर्मुख होण्याची मेहनतीची फार गरज आहे असे प्रामाणिकपणे वाटते.

## संदर्भसूची


१. कैलास सार्वेकर, 'मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास', मेहता पब्लिकेशन हाउस, पुणे, प्र. आ. ऑक्टो. : १९९९, पृ.२

२. तत्रैव, पृ. २४२.

३. कोत्तापल्ले नागनाथ, 'ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि शोध, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, द्वि. आ. डिसें. : २०१०, पृ. ११५.

४. यादव आनंद, 'ग्रामीणता : स्वरुप आणि वास्तव', मेहता पब्लिकेशन हाउस, पुणे १९८१, पृ. १३०

५. सार्वेकर कैलास, 'मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास', मेहता पब्लिकेशन हाउस, पुणे, प्र. आ. ऑक्टो.१९९९, परी. १३५.

६. तत्रैव, पृ. १७०

७. तत्रैव, पृ. १९८

८. कोत्तापल्ले नागनाथ, उनि. पृ. १२४

१०. कोत्तापल्ले नागनाथ, उनि, पृ. ११६

११. पवार पंडितराव, 'मराठी कविता आकलन आणि आस्वाद', दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, २००५, पृ. ३४१

१२. गवस राजन, 'टाळ्यात अडकलेली व्यासपीठे', संपा. सुमती लांडे, वाङ्मयीन चळवळी आणि दृष्टीकोन, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र. आ. जाने. २००८, पृ. २१२.